
# साहित्यबंध

संपादक
डॉ. सतीश कामत



कथाबंध
काव्यबंध
नाद अंतरीचा
सिगारेट्स
सत्यशोधक
कुंपणापलिकडचा देश

शब्दालय

CamScanner

# साहित्यबंध

संपादक
**डॉ. सतीश कामत**

शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

Sahityaband/ Smiksha
Editor : Dr. Satish kamat

साहित्यबंध
संपादक : डॉ. सतीश कामत

• © सर्व हक्क सुरक्षित

• प्रकाशक :
सुमती लांडे
शब्दालय प्रकाशन
पोस्ट बॉक्स नं. १०, वॉर्ड नं. ७
श्रीरामपूर - ४१३ ७०९
मोबाईल- ९८२२००८७९६, ९८२२५२५४४४

• मुखपृष्ठ रचना : शाल्मल

• प्रकाशन क्रमांक : ५४१
पहिली आवृत्ती : डिसेंबर २०१९

• अक्षर जुळणी : अक्षर कॉम्प्युटर्स,
• मुद्रक : स्मिता प्रिंटर्स

• मूल्य: ३५० रुपये

ISBN: 978-81-944176-3-7

email-shabdalaya@gmail.com
www.shabdalaya.com www.facebook.com/shabdalaya
Bookganga, Flipkart, Amazon Kindle

या वेबसाईटवर पुस्तके व ई-बुक्स ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध

CamScanner

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| • | प्रस्तावना | ७ |
| १. | नाटक : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल<br>प्रा. राजरत्न दवणे | १३ |
| २. | 'सत्यशोधक'<br>जोतीराव फुले यांचे चरित्रनाट्य<br>डॉ. गिरीश मोरे | ३७ |
| ३. | 'सिगारेट्स'<br>आधुनिक तरुण पिढीच्या मूल्यव्यवस्थेचा नेमका शोध<br>डॉ. निवृत्ती कार्वेकर | ५१ |
| ४. | प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार<br>डॉ. अनिल बांगर | ६३ |
| ५. | 'कुंपनापलिकडचा देश'<br>स्वास्थ्य व स्थैर्य हरवलेला 'पाकिस्तान'<br>डॉ. सुभाष पाटील | ७६ |
| ६. | श्रीलंकेतील प्रवासाचा आस्वादनामा<br>'नाद अंतरीचा श्रीलंका'<br>डॉ. बाळासो सुतार | १०० |
| ७. | कथाः संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल<br>डॉ. गोमटेश्वर पाटील | १२५ |
| ८. | वैविध्यपूर्ण आणि आशयसंपन्न 'कथाबंध'<br>डॉ. विकास पाटी | १४१ |
| ९. | कविता : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा<br>डॉ. प्राजक्ता शिंत्रे | १६१ |
| १०. | 'काव्यबंध'<br>वर्तमानाच्या अंतर्बाह्य स्वरूपावर प्रकाशझोत<br>डॉ. राजाराम राठोड | १९० |
| ११. | 'काव्यबंध' मधील दलित जाणिवेचे कवी व त्यांची कविता<br>डॉ. सतीश कामत | २१८ |
| • | लेखकांचा परिचय | २३४ |


CamScanner

# ४.
# प्रवासवर्णन
# एक वाङ्.मयप्रकार

डॉ.अनिल बांगर

**प्रास्ताविक**

प्रवासवर्णन हा अर्वाचीन काळातील महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे. प्रवास वर्णनात 'प्रवास' हा केंद्रिभूत घटक असतो. भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून जरी प्रवासवर्णने लिहिलेली असली तरी त्यांना प्रवासवर्णन म्हणून स्थान नव्हते. एखाद्या स्थळाचे वर्णन करणे एवढ्यापुरतेच ते प्रवास वर्णन मर्यादित होते. प्रवासवर्णनाला कलापूर्णता लाभली ती अर्वाचीन कालखंडात. 'प्रवासवर्णन' हा नपुसकलिंगी शब्द 'प्रवास' + 'वर्णन' या दोन शब्दांचा मिळून झालेला जोडशब्द आहे, यापैकी 'प्रवास' हा शब्द पुल्लिंगी सामान्यनाम असून, तो 'प्र+वस' अशा मूळ संस्कृत धातूवरून साधित झालेला आहे. 'प्र' म्हणजे 'दूर'. 'वस' हा धातू 'राहणे' असा अर्थ व्यक्त करतो. 'वस' या संस्कृत धातूवरून 'वास' हे नाम सिद्ध झाले आहे. म्हणजे 'प्रवास' या मूळ शब्दाचा अर्थ 'दूर राहणे' असा होतो. या 'प्रवास' शब्दाचे महाराष्ट्र शब्दकोशात खालीलप्रमाणे अर्थ दिलेले आढळून येतात.

१) स्वदेश सोडून अन्यत्र जाणे,देशाटन,परदेशसंचार.

२) परदेशात केलेला तात्पुरता वास,परदेशात प्रवास करताना राहणे.

३) परदेश.

'प्रवास'या शब्दावरून 'प्रवास' असा शब्दप्रयोग सिद्ध होऊ पाहतो तो अकर्मक क्रियापद असून त्याचा अर्थ 'प्रवास करणे' असा होईल. 'प्रवास' या शब्दावरून 'प्रवासी' असा जो शब्द तयार होतो तो ही पुल्लिंगी सामन्यनाम आहे आणि त्या शब्दाचे अर्थ 'प्रवास करणारा', 'मुशाफिर' 'उतारू', असे दिलेले आढळतात. 'पांथस्थ', 'वर्णन' हा शब्द सामान्यनाम असून ते मराठीत वापरत असताना



Scanned with CamScanner

नपुसकलिंगी वापरले जाते. 'वर्णन' या शब्दाचे स्तुती, प्रशंसा, गौरव, गुणधर्म, माहिती, विशेष गोष्ट सांगणे, शब्दचित्र असे अनेक अर्थ श्री. य. रा. दाते संपादित महाराष्ट्र शब्दकोशात दिलेले आढळतात. यावरून आपल्याला असे म्हणता येते की, परदेश संचार करून किंवा परदेशातून राहून किंवा स्वदेश सोडून अन्यत्र गेल्यावर त्याचे वर्णन ज्यात येत असेल ते खऱ्या अर्थाने 'प्रवासवर्णन' ठरू शकेल. प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचे तात्विक विवेचन करीत असताना किंवा त्याचे स्वरूप समजून घेताना पुढील मुद्द्यांचा विचार करावा लागतो.

**'प्रवासवर्णन' व्याख्या**

१) प्रवासवर्णन म्हणजे प्रवासात पाहिलेल्या किंवा घडलेल्या गोष्टींचा वृत्तांत होय.

२) प्रवासवर्णन म्हणजे प्रवासपर सचित्र भाषण अगर व्याख्यान होय.

३) प्रवासी, प्रवास व प्रदेश या घटकांनी साकार होणारे लालित्यपूर्ण लेखन म्हणजे प्रवासवर्णन होय.

'प्रवासवर्णन' या रूढ शब्दप्रयोगात 'प्रवासवृत्त', 'प्रवास चित्रणात्मक लेखन', 'प्रवासचित्रण', 'प्रवासलेखन' हे अर्थ सामावलेले आहेत.

**प्रवासवर्णनाचे स्वरूप**

प्रवासवर्णन या शब्द प्रयोगावाबत 'प्रवासवृत्त' आणि 'प्रवासवर्णन' हे शब्दप्रयोग बहुतांशी रूढ असलेले आहेत. 'प्रवास चित्रणात्मक लेखन' हा शब्दप्रयोग वा. ल. कुलकर्णी यांचा 'वाटचाल' या प्रस्तावनेत येतो. 'प्रवासलेखन' हा शब्दप्रयोग रा. भि. जोशी यांच्या 'मजल-दरमजल' च्या प्रस्तावनेत येतो. 'प्रवास-चित्रण' हा शब्दप्रयोग श्री. काशीनाथ पोतदार यांनी केला आहे.

'प्रवासवर्णन' मूलतः ज्या अनेक घटकांनी साकारले, त्यापैकी पहिला आणि महत्त्वाचा घटक म्हणजे प्रवासी हा होय. दुसरा घटक प्रवास आणि तिसरा घटक प्रदेश. या प्रवाशाने सर्वसामान्यपणे कोणत्याही प्रदेशाचा प्रवास सुरु केल्यावर त्याबद्दल तो काही बोलला अगर त्याने काही लिहिले तरच प्रवासवर्णनाला अस्तित्व असते. प्रवासवर्णनात लालित्याला महत्त्व असते. लालित्य म्हणजे कलापूर्ण सौंदर्य होय.

**१. प्रवासी**

प्रवासवर्णन आणि प्रवासी हे अविभाज्य घटक आहेत. प्रवासवर्णनात प्रवासी नसेल तर प्रवासवर्णनाला 'प्रवासवर्णन' म्हणून अस्तित्व असणे शक्य नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण प्रवास करणारा कोणी प्रवासी असल्याशिवाय प्रवास घडणे शक्य नाही आणि या प्रवासाबद्दल जर त्या प्रवाशाने काही लिहिले नाही किंवा तो बोलला नाही तर 'प्रवासवर्णन' साकारणे शक्य नाही. हा प्रवास त्या



लेखकाचा स्वतःचा प्रवास असतो. त्याबद्दल त्याला जो बरा-वाईट अनुभव आला असेल तो त्याचा स्वतःचा अनुभव असतो. प्रत्येक प्रवाशाला एकसारखा प्रवास आणि तसाच एकसारखा अनुभव येईल असे नाही. ती त्याची त्यावेळची एक वैयक्तिक बाब असते. तो अनुभव त्याने स्वतः व्यक्त केला की आपोआपच त्यावेळच्या प्रवासातील त्याचे स्वतःचे अनुभवविश्व निर्माण होते. म्हणूनच प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे 'प्रवास चित्रणात्मक लेखन' हे स्वभावतःच प्रथमपुरुषी असते. म्हणजेच, प्रवासवर्णनात लेखक स्वतः बोलत असतो. लेखक जेव्हा लिहितो तेव्हा त्याचे व त्या प्रदेशाचे कलात्मक दर्शन तो घडवित असतो. इतर वाङ्मयीन घटनांतून व्यक्त होणाऱ्या 'मी' ला जशी 'स्व' ची कलात्मक विस्मृती आवश्यक असते. तशीच ती इथे आवश्यक असते.

प्रवासवर्णनात जो 'मी' व्यक्त होत असतो तो दोन प्रकारचा 'मी' असतो. एक लौकिक पातळीवरचा 'मी' आणि दुसरा कलात्मक पातळीवरचा 'मी'. या दोन 'मी' नी युक्त असल्यामुळे व त्यांच्या लौकिक कलात्मक पातळ्या सतत बदलत असल्याने त्यांचे स्वरूप संमिश्र रीतीने प्रवास प्रवासवर्णनात जाणवत राहते. प्रवासवर्णनात जसा प्रवासी व्यक्त होतो तसा त्या प्रवासातील कलावंतही व्यक्त होतो. हा कलावंत किंवा लेखक म्हणून जो कोणी 'मी' व्यक्त होतो, तो वेगळा 'मी' असतो. तो अपरिहार्यपणे व्यक्त होत राहतो किंवा राहत नाहीही ! कलात्मक पातळीवर व्यक्त होणाऱ्या या 'मी' चे चित्र काढणे ही तारेवरची कसरत आहे. श्री. पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई'त' व्यक्त होणाऱ्या 'मी' चे स्वरूप उदाहरण म्हणून घेता येईल. हा 'मी' बराचसा व्यंगात्मक किंवा विडंबनात्मक आहे, असे लेखकाने स्वतःचे रूप काढणे व शोधणे, हे श्रेष्ठ दर्जाची प्रतिभाशक्ती लेखकापाशी असल्याशिवाय शक्य नसते. या विवेचनावरून असे म्हणता येते की प्रवास आणि प्रवासी हे प्रवासवर्णनाचे अविभाज्य घटक आहेत.

**२. प्रवास**

'प्रवासी' या प्रवासवर्णनाच्या घटक तत्त्वाचे स्वरूप पाहिल्यावर आपल्याला 'प्रवास' व 'प्रदेश' या घटकांकडे वळावे लागते. त्यापैकी 'प्रवासतत्त्व' हे प्रवासवर्णनाचे केंद्रिभूत घटक तत्त्व मानावे लागते. ते प्रवासी आणि प्रदेश या दोन घटकांना जोडणारे दुव्यासारखे तत्त्व आहे, असे म्हणता येईल. 'प्रवासी' हे नामाभिधान प्रवासवर्णनाच्या लेखकाला प्रवास केल्यानेच प्राप्त होते. प्रवासवर्णनाचा लेखक हा नुसता लेखक नसतो, तर तो 'प्रवासी लेखक' असतो. त्याने प्रत्यक्ष प्रवास करूनच प्रवासवर्णन लिहायचे असते. 'प्रवास' नसेल तर प्रवासवर्णन कशाचे करायचे? 'प्रवासवर्णन' या संज्ञेतील 'प्रवास' हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कारण ते त्याच्या विशिष्ट प्रवासाचे केलेले वर्णन असते. प्रवासवर्णनात प्रवासाचे

जे चित्र येते, त्या चित्राची खुमारी 'प्रवास' या घटकामुळेच निर्माण होत असते. कारण लेखक प्रवाशाची भूमिका करीत असल्याने त्या प्रवासात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग अधिक खुलून उठतात. दैनंदिन जीवनाच्या चाकोरीतून प्रवासात असल्याने मनावरील एक प्रकारचा ताण दूर सारला जातो. रोजच्या जीवनामुळे निर्माण झालेले सांकेतिकपणा झडून जातो. मनावरील दडपणे गळून पडतात आणि प्रवासातील नव्या संस्कारांनी प्रवासी लेखकाच्या मनाचे काने-कोपरे ताजे, टवटवीत होऊन उजळून निघतात.

'प्रवास' या घटक तत्त्वामुळेच स्थळवर्णनाहून व इतर वाङ्मय प्रकारांहून प्रवासवर्णन वेगळे ठरत असते. हे प्रवासतत्त्व सतत फिरते व केंद्रिभूत राहिल्याने त्याचा वेगळा गतिशील आविष्कार प्रवासवर्णनात होत राहतो. 'प्रवास' ही मानवी जीवनाची एक मुलभूत प्रेरणा आहे. अशा प्रवासातील अनुभूतीचा कलात्मक आविष्कार प्रवासवर्णनात घडणे महत्त्वाचे असते.

### ३. प्रदेश

प्रवास या घटक तत्त्वाबरोबरच अत्यंत महत्त्वाचे तिसरे तत्त्व प्रवासवर्णनाला साकार करत असते ते म्हणजे प्रदेशतत्त्व होय. 'प्रवास' आणि 'प्रदेश' मग तो कोणताही असो, प्रवासवर्णनात अपरिहार्यपणे अवतरत असतो, कोणताही 'प्रदेश' याचा अर्थ स्वदेशातील प्रदेश, परदेशातील प्रदेश अगर अंतराळातील प्रदेश असाही होऊ शकतो. प्रदेश शब्दाची व्याप्ती मोठी आहे. प्रवासवर्णनात व्यक्त होणारा 'प्रदेश' म्हणजे केवळ 'स्थळ' नव्हे. आजवर मराठीत प्रदेशाला 'स्थळ' समजून त्याची चर्चा झालेली दिसते. प्रवासवर्णनात व्यक्त होणारे 'स्थळ' प्रदेशाच्या अनुषंगाने व्यक्त होते ते स्थळ त्या व्यक्त प्रदेशाचा एक घटक असते.

प्रदेश म्हटल्यावरोवर त्याचा भूगोल, इतिहास, धर्म, कला, तिथला निसर्ग, तिथले वातावरण व इतर गोचर व अगोचर होणाऱ्या गोष्टी, तसेच इतर त्या-त्या प्रदेशाची खास काही वैशिष्ट्ये यात अभिव्यक्त होऊ शकतात. प्रवासवर्णनात जो प्रदेश व्यक्त होऊ शकतो त्यांची व्याप्ती ही अशी अनेक प्रकारची असल्यामुळे त्याला केवळ 'स्थळ' म्हणणे युक्त होणार नाही. म्हणजेच प्रवासवर्णनात जो प्रदेश व्यक्त होतो तो प्रदेश भौगोलिक वैशिष्ट्यांनी व मर्यादांनी युक्त असा केवळ 'प्रदेश' नसतो किंवा 'स्थळ' ही नसते. तर एका विशिष्ट प्रवासी लेखकाला, एका विशिष्ट रीतीने जाणवलेला एक चालता बोलता चैतन्यशील माणसासारखा विशिष्ट व्यक्तिमत्व लाभलेला भूप्रदेश होय.

वरील विवेचनावरून आपणाला असे म्हणता येते की, प्रवासवर्णनात साकार होणारा प्रदेश हा चैतन्यशाली प्रदेश असतो तो माणसासारखा त्या प्रवासी लेखकाला भेटत असतो. उदा. 'तोंकोन्रामा' मध्ये श्री. प्रभाकर पाध्यांना जाणवलेला जपान,



'अपूर्वाई'मध्ये श्री. पु. ल. देशपांडे यांना भेटलेला फ्रान्स ही काही ठळक उदाहरणे मानता येतात.

प्रवासवर्णन हा ललितवाङ्मय प्रकार आहे. प्रवासवर्णनात 'प्रवास' हा घटक केंद्रिभूत मानला जातो. कारण प्रवास झाल्यामुळेच वर्णनाला महत्त्व प्राप्त होते, पण केलेले वर्णन नुसते माहितीपूर्ण नसावे, त्याला लालित्याची जोड असावी लागते. म्हणूनच प्रवासवर्णनाचा तात्त्विक विचार करताना प्रवासवर्णनाचे तात्त्विकघटक प्रवासी, प्रवास व प्रदेश यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. प्रवासी म्हणजेच लेखक जेव्हा प्रवास करतो तेव्हा त्याची सूक्ष्म निरीक्षणशक्ती जागृत असते. प्रतिभेच्या जोरावर तो लालित्यपूर्ण रचना करतो. सामान्य पर्यटकापेक्षा प्रवासवर्णन लेखकाची दृष्टी चिकित्सक व सौंदर्यपूर्ण असते म्हणूनच प्रवासवर्णनाला वेगळेपण प्राप्त होते. प्रवासवर्णन हा अर्वाचीन कालखंडात म्हणूनच अधिक लोकप्रिय झालेला आढळतो. रा. भि. जोशी, प्रभाकर पाध्ये, पु.ल. देशपांडे यांनी अतिशय दर्जेदार प्रवासवर्णने लिहिली आहेत. यामुळेच प्रवासवर्णनाने वाङ्मयामध्ये आपले स्थान अढळपणे टिकवून ठेवले आहे.

### 'प्रवासवर्णन' या वाङ्मय प्रकारची प्रेरणा व प्रयोजन

भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून वेगवेगळ्या कारणासाठी प्रवास झालेला दिसतो पण प्रवासवर्णनाला वाङ्मय प्रकार म्हणून महत्त्व प्राप्त झाले ते अर्वाचीन काळात. प्रवासलेखनाची दृष्टी ही अर्वाचीन दृष्टी आहे. आज प्रवास सांगण्यापेक्षा लिहिला जातो. इ.स. १८०० ते १९६५ या कालखंडात प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकारची झपाट्याने वाढ होत गेली आहे. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे विज्ञाननिष्ठ पाश्चात्य संस्कृतीने वाङ्मयकलेला वहाल केलेला मुद्रणकलेचा वरदहस्त होय. प्रवासविषयक वाङ्मयाच्या वाढीमागील आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे पाश्चात्य राज्यकर्त्यांचा आपल्याशी आलेला संबंध अनेक दृष्टींनी प्रेरक ठरला. पाश्चात्य संस्कृतीने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून निर्मिलेल्या प्रवासविषयक साधनांतील सुलभता व सोयी पाहून, भारतीयांचा प्रवासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. जिज्ञासायुक्त मनाने निरीक्षण सुरु झाले. पूर्वी तीर्थयात्रेनिमित्त, आनंदाप्रीत्यर्थ सहली, धार्मिक बाबींसाठी, व्यापारास्तव, धनलाभास्तव, लौकिकाचे ज्ञान मिळविण्यासाठी, परदेश दौरे इत्यादी अनेक कारणांनी 'प्रवास' घडायचे. अर्वाचीन काळात ज्ञानलालसा वाढली, शिक्षणाच्या सोयी वाढल्या, साधनसुविधा वाढल्या, अज्ञानाचा अंधःकार नाहीसा होऊ लागला व प्रवासाची सुधारणा पाहून तो करावसा वाटू लागला. अशा या वाङ्मयप्रकारच्या प्रेरणा व प्रयोजने पुढीलप्रमाणे सांगता येतील.



CamScanner

**१. ज्ञानदान व ज्ञानग्रहण**

प्रारंभकाळी ज्ञानदानाची व ज्ञानग्रहणाची प्रेरणा वाढली. इ.स. १८०० ते १८७४ आणि पुढे काही काळापर्यंत प्रवासवर्णनपर वाङ्मयनिर्मितीची ही एक प्रमुख प्रेरणा होती. याबाबत श्री. जगन्नाथ विठोबा क्षत्री यांच्या 'गोकर्ण महाबळेश्वराचे यात्रेप्रकरणी वृत्तांत' या प्रवासवर्णनाचा उल्लेख करता येईल. म्हणजेच ज्ञानदानाची व ज्ञानग्रहणाची प्रेरणा प्रमुख होती. त्याचबरोबर त्यातील माहिती ही त्या-त्या काळातील वाचकांसाठी मोलाची होती. प्राचीन मराठी साहित्यात ऋद्धिपूरवर्णनासारखे लेखन धार्मिक / अध्यात्मिक प्रेरणेतून निर्माण झालेले दिसते. परंतु अर्वाचीन कालखंडातील लेखन प्रामुख्याने ऐहिक समृद्धीच्या मूल्यांना सामोरे जाऊन झाले आहे. याचे प्रमुख कारण, हा कालखंडच राष्ट्रीय उत्पादनाचा, प्रबोधनाचा कालखंड मानला जातो. म्हणूनच साहित्याद्वारे समाजप्रबोधन हा हेतू त्यात स्वच्छ दिसतो आणि या दृष्टीने या ग्रंथातून बऱ्याचदा पर्यटनाचे महत्त्व विशद करून सांगितलेले आढळते.

**२. आत्माविष्कार**

प्रवासविषयक अनुभव हाही एक अनुभव आहे. प्रवास करताना जे आपण पहिले व अनुभवले ते दुसऱ्यास सांगावे ही प्रेरणा मानवी मनाची एक मुलभूत प्रेरणा आहे. अशा आत्माविष्काराच्या प्रबळ प्रेरणेतून झालेले प्रवासलेखन अस्सल कलाकृतीचे गुण दर्शविणारे होत असते. अशा जाणिवेने झालेले प्रवासलेखन वाङ्मयप्रकारची वाङ्मयप्रकार म्हणून यशस्वी वाटचाल दाखविणारे ठरते. पंडिता रमाबाई, गोडसे भटजी, काकासाहेब कालेलकर, प्रा. अनंत काणेकर, रा.भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, पु.ल. देशपांडे आणि प्रभाकर पाध्ये इत्यादी लेखकांनी प्रवासलेखन आत्माविष्काराच्या प्रबळ प्रेरणेतून झाल्याचे स्पष्टपणे जाणवते.

**३. सौंदर्यगानाची प्रेरणा**

एखादा देश, प्रांत, स्थळ, तिथला निसर्ग, प्रवासी मनाला आपल्या सौंदर्याने भूल घालतो आणि तो देश, प्रांत, स्थळ, तिथला निसर्गच प्रवासी लेखकाला प्रवास करण्यासाठी उद्युक्त करतो. अशावेळी त्या देशाच्या प्रवासात जाणवलेले सौंदर्य टिपणे व त्याचे गान या निव्वळ सौंदर्यवादी प्रेरणेतूनही प्रवासलेखन घडू शकते. उदा. 'तोकोनामा' हे प्रभाकर पाध्ये यांचे प्रवासवर्णन जपानचे सौंदर्यगान करण्याच्या प्रेरणेतून निर्माण झाले आहे. जपानच्या जाणवलेल्या सौंदर्याच्या धुंदीत त्याचे लेखन घडले आहे.

**४. नियतकालिकांद्वारे मिळालेल्या प्रेरणा**

वर्तमानपत्राच्या संपादकांनी किंवा मासिकांच्या संपादकांनी लिहायला प्रवृत्त केले म्हणूनही अर्वाचीन मराठीत प्रवासलेखन घडले आहे. म्हणूनच या प्रकारच्या



वाङ्मयनिर्मितीत नियतकालिकांचा फार मोठा वाटा आहे. प्रवासलेखाला खास जागा देऊन छापणे, छापलेल्या लेखांचे पुढे पुस्तक तयार होणे त्याबाबत मनोरंजन, केसरी, किर्लोस्कर, सत्यकथा ही नियतकालिके महत्त्वाची ठरतात. प्रा. अनंत काणेकरांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे प्रख्यात प्रवासवर्णन प्रथमतः पत्ररूपाने किर्लोस्कर मासिकात क्रमशः अवतरले होते. त्याचबरोबर पु.ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' याचे उदाहरण देता येईल. ही प्रवासवर्णने प्रथम क्रमशः लेखरूपाने किर्लोस्कर मासिकातून अवतरली. म्हणूनच नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रातून काही एक प्रेरणा प्रवासवर्णन लेखनाला मिळालेली दिसते.

**५. राष्ट्रवादाच्या प्रेरणा**

भारतभूमीच्या शक्तीतून वा राष्ट्रवादी वृत्तीतून प्रवासवर्णने लिहिल्याची प्रेरणा आपल्याला पहायला मिळते. आचार्य काका कालेलकर व डॉ. वसंत अवसरे यांचे लेखन एका राष्ट्रवादी विचारसरणीतून व भारतभक्तीतून झाल्याचे स्पष्ट दिसते. म्हणजेच प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकारच्या निर्मिती मागील प्रेरणा व प्रयोजने पाहताना राष्ट्रवादी भूमिकेचा विचार करावा लागतो.

**६. आपला प्रवासानुभव पुढील पिढीला कळावा**

विष्णुभटजींच्या लेखनामागे आपला प्रवासानुभव पुढील पिढीला कळावा, या प्रेरणेतून 'माझा प्रवास' या प्रख्यात प्रवासवर्णनाचे उदाहरण पाहता येईल. म्हणजेच प्रवासवर्णने लिहिण्यापाठीमागे पुढील पिढीला आपला प्रवासानुभव कळावा हा हेतू असू शकतो.

**७. राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती**

राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे वास्तवचित्र रेखाटावे, या प्रेरणेतूनही काही वेळा प्रवासलेखन घडले आहे. उदा. पंडिता रमाबाई, श्री.रा.टिकेकर, डॉ. वसंत अवसरे, वा.भ.कर्णिक व द्वा.भ.कर्णिक इत्यादी लेखकांचे प्रवासवर्णनाचा विचार करता येतो. पंडिता रमाबाईंनी अमेरिकन जीवनातील लोकशाहीचा महामंत्र हा अमेरिकन लोकांना सुखाकडे व समृद्धीकडे कसा नेतो आहे, त्याचे स्पष्ट चित्र काढले आहे.

**८. इतर प्रेरणा**

अर्वाचीन कालखंडातील भारतीय मन मूलतः धार्मिक भावनेतूनसुद्धा प्रवासाला निघताना दिसते. या मूळच्या अध्यात्मप्रवण मनाला तीर्थयात्रेची माहिती देण्याच्या हेतूने श्री. शामराव मोरोजी यांची 'काशीप्रकाश म्हणजे महायात्रावर्णन' याचे उदाहरण आपणाला सांगता येते. ज्ञान व मनोरंजनाच्या हेतूने प्रेरित होऊन गो.चि.भाट्यांची प्रवासवृत्तमाला अवतरल्याचे स्पष्ट दिसते. त्याचबरोबर भाषांतर ही देखील प्रवासवर्णन निर्मिती मागील एक प्रेरणा सांगता येते. भाषांतराच्या प्रेरणेपाठीमागे दुसऱ्या भाषेतील



CamScanner

समृद्ध ज्ञानसाठा व वाङ्मयधन आपल्याही भाषेत आणावे, हा हेतू स्पष्ट दिसून येतो.

एखादा प्रवासग्रंथ एकाच वेळी विविध प्रकारच्या प्रेरणांना सामोरा जाताना दिसतो. उदा. प्रा. अनंत कानेकारांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे प्रवासवर्णन एकाच वेळी आत्माविष्कार, सौंदर्यगानाची, ज्ञानग्रहणाची व ज्ञानदानाची, किर्लोस्कर मासिकाद्वारे लेखनाला उद्युक्त झाल्याची प्रेरणा सांगू शकते. म्हणजेच एकाचवेळी विविध प्रेरणा प्रयोजने प्रवासलेखनामागे असू शकतात असे म्हणता येते.

**'प्रवासवर्णन' या वाङ्मय प्रकाराची वाटचाल**

प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार अर्वाचीन कालखंडात असला तरी एकंदर भारतीय साहित्यात व्यक्त होणारी 'प्रवास परंपरा' वेदकाळापासून ते रामायण, महाभारत काळापर्यंत व पुढे ऐतिहासिक युगापर्यंत चालत आलेली दिसते. प्रवासवर्णन त्याच्या वैशिष्ट्यांमुळे वेगळे दिसते. म्हणून हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा वेगळ्या पद्धतीने उठून दिसतो. याचबरोबर 'प्रवासवर्णन' हा एक वाङ्मय प्रकार असा आहे की, ज्यामध्ये लेखकाच्या सर्वंकष, बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर व्यक्त व्हायला वाव असतो.

या लेखनात प्रतिभाशक्तीचे कार्य जेव्हा सुरू होते, तेव्हा ते लेखन खऱ्याखुऱ्या अर्थाने कलारूप धारण करणारे लेखन ठरते. प्रवासवर्णनाची वाटचाल पाहताना प्राचीन काळातील महानुभाव पंथापासून आपल्याला ही वाटचाल पहावी लागते. 'ऋद्धीपूरवर्णन' पासून 'तोकोनामा' पर्यंत प्रवासवर्णनाची वाटचाल वेगवेगळ्या अंगाने झालेली दिसते.

**१. प्राचीन कालखंड**

प्राचीन मराठी वाङ्मयात प्रवासविषयक प्रेरणा प्रामुख्याने आध्यात्मिक व धार्मिक आहेत आणि त्यामुळेच महानुभव, संत किंवा पंडितकवी इत्यादी तीर्थयात्रांनिमित्त प्रवास करतात असे दिसते. त्या पाठीमागे पंथप्रसार करावा हाही हेतू असू शकेल. यांच्या प्रवासलेखनाला आत्मचरित्रपरतेचे रंग चढलेले दिसतात. त्यांनी आपल्या तीर्थयात्रांचे व यात्रेतील स्थळांचे चित्रण केल्याचे दिसते.

या वाङ्मय प्रकाराचे प्राचीन रूप नारायणव्यास बहालिये कृत महानुभाव पंथाच्या 'ऋद्धीपूरवर्णन' या प्रख्यात ग्रंथात पाहाणे शक्य आहे. 'ऋद्धीपूरचा' प्रवास करून लेखक त्यात स्वतःचे आणि ऋद्धीपूरच्या प्रदेशाचे चित्र बऱ्याच सामर्थ्यानिशी दाखवितो. त्यानंतर निरंजन माधवाने आपल्या तीर्थयात्रावर्णनात प्रवास, प्रदेश यांचे काही लक्षणीय चित्रे रेखाटलेले आढळते. त्याचबरोबर नामदेवांचे 'तीर्थावली', रामदासांचे 'भारतभ्रमंती', दत्तपंथातील मुकुंदकवीचे 'प्रवासवर्णन' व



तंजावरच्या शरफोजी राजांच्या 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या' या ग्रंथाचा या कालखंडात उल्लेख करता येईल.

**२. इ. स. १८०० ते १९४० कालखंड**

प्रवासवर्णनाच्या वाङ्मयीन रुपाची वेगळी जाणीव प्राचीन मराठी साहित्यिकांना नव्हती प्रवासाकडे व प्रवासलेखनाकडे सौंदर्यवादी दृष्टीने पाहणे आणि प्रवासवर्णनाच्या वाङ्मयीन रुपाकडे एक वेगळे वाङ्मयीन रूप म्हणून पाहणे ही दृष्टी खास अर्वाचीन आहे. इ.स. १८०० ते १८८२ या अर्वाचीन कालखंडात प्रवासवर्णनाचे क्वचित कच्चे व ओबडधोबड रूप प्रभावी आहे. अर्वाचीन काळातील पहिला प्रवासवर्णनकार लेखक म्हणून श्री. नाना नारायण व त्यांचे 'इंग्लंड देशाचे वर्णन' हा भाषांतरित ग्रंथ दाते सूचीत दिलेला आहे.

परंतु प्रवासवर्णनाचा पहिला स्वतंत्र आविष्कार, जगन्नाथ विठोबा अत्री यांच्या इ.स. १८६३ च्या 'गोकर्ण महाबळेश्वराचे यात्रेप्रकरणी वृत्तान्तात' घडतो. वाङ्मयीन रूपाचा या काळातील दुसरा टप्पा हरि गणेश पटवर्धन यांच्या 'काशीयात्रा' या ग्रंथाकडे जातो. तिसरा टप्पा, पंडिता रमाबाईंच्या 'इंग्लंडचा प्रवास भाग १ ला' आणि श्री. गोडसे भट वरसईकर यांच्या 'माझा प्रवास' या ग्रंथाकड येईल.

या ग्रंथांनी प्रवासवर्णनाचे खास रूप दाखविले असून या दोघाही लेखकांची व्यक्तिमत्त्वे त्यात अभावितपणे व उत्कटतेने उतरली आहेत. गोडसेभटजींचा 'माझा प्रवास' हा ग्रंथ जुन्याप्रमाणे नव्या सौंदर्यदृष्टीचा परिपाक वाटून जातो. यानंतर चौथा टप्पा म्हणून सौ. पार्वतीबाई चिटणवीस यांच्या 'आमचा जगाचा प्रवास' या ग्रंथाकडे येईल. या ग्रंथांत कोणत्याही प्रकारची माहिती देण्याचे बंधन लेखिकेने मानलेले नाही. केवळ आपल्या पतिसमवेत केलेला सौंदर्यवादी दृष्टीने निर्मळ शैलीत टिपण्याचा हा प्रयत्न खास लक्षणीय आहे. यानंतर श्री. ग. स. मराठे, श्री. न. चि. केळकर, श्री. श्री. रा. टिकेकर, श्री. गो. चि. भाटे यांच्या लेखनाचा उल्लेख करता येतो.

**३. १९४० ते १९६५ कालखंड**

वाङ्मय प्रकाराच्या वाटचालीवरील पहिला दीपस्तंभ म्हणून प्रा. अनंत काणेकरांचे नाव निःशंकपणे घ्यावे लागते. याचे कारण प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराची एक कलात्मक वाङ्मय प्रकार म्हणून काणेकरांनी व्यक्त केलेली जाणीव इतरांच्या मानाने खास वेगळी आहे. ही जाणीव आजतागयत कायम असल्याचे 'खडक कोरतात आकाश' या ग्रंथावरूनही कळते. प्रा. काणेकरांनी प्रवासवर्णनाच्या रूपातील व्यक्तिमत्त्वाच्या अगम्य खाणीचा व काव्यात्मतेचा पहिला व निश्चित शोध लावला. त्यांच्या पूर्वीच्या लेखकांना हा शोध लागलाच होता असे म्हणता येत नाही.



CamScanner

श्री. जगन्नाथ विठोबा अत्रे, गणेश पटवर्धन, पंडिता रमाबाई, सौ. चिटणवीस, म. स. मराठे, केळकर, टिकेकर, भाटे हे लेखक प्रवासवृत्तांत पुरवता पुरवता त्यांच्या प्रवासवर्णनातून लेखक म्हणून व्यक्त झालेले दिसून येतात. श्री. काकासाहेब कालेलकरांनी प्रदेशव्याप्तीची कमाल मर्यादा गाठली आहे. प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराची तत्त्वचिंतनात्मक बाजू वाढवून आपल्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांनी जनोजागर केला आहे. प्रा. श. भि. जोशी यांनी प्रवासवर्णनाच्या आशयाची सूक्ष्मता टिपली आहे. प्रचलित प्रदेशाचा आत्मा आपल्या ताशीव व संयत शैलीत टिपण्याची श्री. जोशी यांची हातोटी त्यांच्या प्रवासवर्णनाला खास वेगळेपण आणते, म्हणून त्यांची वाटचाल, मजल दरमजल, उध्दव ही प्रवासवर्णने खासवेगळी ठरतात.

श्री. पु. ल. देशपांडे यांनी प्रवासवर्णनाला विनोदकलेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आणि त्याचे सामर्थ्य व सौंदर्य वेगळ्या दिशेने वाढविले. अपूर्वाई व पूर्वरंग ही त्यांची प्रवासवर्णने श्रेष्ठदर्जाची आहेत. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या शुद्ध कलात्मक व सौंदर्यात्मक शृंगारिक लेखनाने, प्रवासवर्णनाच्या रुपाला कळसाला नेऊन पोहोचविले आहे.

## ४. १९६६ पासून पुढे

मागील कालखंडाच्या मानाने पुढच्या कालखंडात प्रवासपर साहित्यकृतीची, कलाकृती यादृष्टीने, निर्मिती कमी झालेली दिसेल परंतु तिचा आशय अनेकांनी विस्तारला आहे. या कालखंडात पु. ल. देशपांडे, रा. भि. जोशी यांसारखे जुने लेखक तर यादृष्टीने महत्त्वाचे आहेतच पण श्री. रविंद्र पिंगे यांच्यासारख्या नवा लेखक वाङ्मय प्रकाराच्या दृष्टीने नवे आशास्थान बनलेले दिसतात. सुमारे पाऊणशे नवे लेखक या कालखंडात निर्माण झाले आहेत. त्यांच्याबरोबर दि. बा. मोकाशी, व्यंकटेश माडगूळकर, माधव गडकरी, दिलीप चित्रे, वसंत बापट, रवींद्र केळेकर, इंदुमती शेवडे, शांता धांदरफळे, लक्ष्मण गायकवाड, मीना प्रभू इत्यादी लेखक महत्त्वाचे आहेत.

## 'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये

ललितगद्य यांची काही अंतर्गत वैशिष्ट्ये ज्याप्रमाणे कथा, कविता, कादंबरी, असतात त्याचप्रमाणे प्रवासवर्णनपर लेखनाची काही अंतर्गत वैशिष्ट्ये असतात आणि हीच अंतर्गत वैशिष्ट्ये त्या वाङ्मय प्रकाराला इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळे ठेवण्याचे काम करतात. या अंतर्गत घटकात रचना लालित्य किंवा सौंदर्य, भाषेचा वापर, गुणवैशिष्ट्ये यांचा विचार आपण प्रामुख्याने करत असतो.

### १. प्रवासवर्णनाची घटकतत्त्वे

प्रवासवर्णन हा वेगळा वाङ्मयप्रकार आहे हे ठरवताना प्रवास, प्रवासी व



प्रदेश या तीन घटक तत्त्वाचा विचार करावा लागतो. या घटक तत्त्वामुळेच प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळा ठरतो. प्रवास, प्रवासी व प्रदेश हे तीन घटक इतर कोणत्याही साहित्यप्रकारात येत नाहीत आणि जरी ते आले तरी ते फक्त अनुषंगिक भाग म्हणूनच त्याचा विचार केला जातो म्हणूनच प्रवासवर्णनाची घटकतत्त्वे हे प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचे महत्त्वाचे विशेष मानता येते.

### २. प्रवासवर्णनातील काव्यात्मता व लालित्य

प्रवासवर्णनकाराचे मन हे प्रतिभासंपन्न असते. हे प्रतिभावान मन एक वेगळे मन असते. ते पूर्ण संस्कारमय असते. ही संस्कारक्षमता जन्माबरोबर त्याला निसर्गानेच प्राप्त करून दिलेली असते. ती जीवन जगताना पूर्ण होत जाते. पुढे लेखकाच्या बहुश्रुततेमुळे, अभ्यासामुळे, रसिकतेमुळे, सभोवतालच्या परिस्थितीने, तिच्या अवलोकनाने, एका विशिष्ट रीतीने तिची वाढ होऊन, अनेक अंगांनी तिचे पोषण झालेले असते. या प्रतिभावान मनाची संवेदनशीलता, तादात्म्य व तरलता या पैलूंमुळे प्रवासवर्णनात काव्यात्मता व लालित्य अवतरते.

### ३. अनुकरण प्रवृत्ती नाही

'प्रवासवर्णन' या वाङ्मय प्रकाराचे अनुकरण करता येत नाही. अनुकरणाची प्रवृत्ती या वाङ्मयप्रकारात दिसत नाही. हे या वाङ्मय प्रकाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागते. कारण अनुकरणाची प्रवृत्ती ही इतर काही वाङ्मयप्रकारात थोड्याफार प्रमाणात तरी आढळून येते. तसे या वाङ्मयप्रकारात घडत नाही. उदा. 'सातासमुद्रापलीकडे' या श्री. गंगाधर गाडगीळांच्या किंवा 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या काणेकरांच्या प्रवासवर्णनांचे अनुकरण सर्वस्वी अशक्य होय. इतकी ही प्रवासवर्णने त्या-त्या लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेली असतात.

### ४. वास्तववादी वाङ्मयप्रकार

प्रवासवर्णनात चालत्या बोलत्या चित्रणामुळे, प्रवासवर्णन वास्तववादी वाङ्मयप्रकार ठरतो. कारण त्या त्या प्रदेशाचे यथातथ्य चित्रण लेखक रेखाटतो, तसेच त्या प्रदेशाचे औद्योगिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पैलूंनी युक्त असेही चित्र रेखाटलेले असते. हे चित्रण वाचल्यावर, त्या प्रदेशाच्या वातावरणनिर्मितीचा प्रत्ययही रसिकाला येऊन जणू त्या प्रदेशाचा आत्ताच प्रवास करून आलो अशा तऱ्हेचा प्रत्यय रसिकाला येतो. म्हणूनच वास्तववादी वाङ्मयप्रकार म्हणून प्रवासवर्णनाला वेगळेपणा प्राप्त होतो.

### ५. अनुभवविश्वाचा वेगळेपणा

प्रवासवर्णनातील अनुभवविश्व हे वास्तव जगाशी म्हणजे प्रामुख्याने प्रवासी लेखक, प्रवास व प्रदेश या त्याच्या मूळ घटकांशी निगडीत असल्याने आणि प्रवासामुळेच ते निर्माण होत असल्याने, ते आगळे असते. असा अनुभवांचा



CamScanner

आगळेपणा जवळजवळ इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारात आढळून येत नसल्याने 'प्रवासवर्णन' हा एक वेगळा वाङ्मयप्रकार ठरतो. अनुभवविश्वाचा वेगळेपणा हा प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचा खास विशेष ठरतो.

**६. भाष्यात्मकता**

प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकारात एकाच वेळी जीवनाच्या अनेक प्रमुख अंगावर होणारे 'भाष्य' येते. हे भाष्य सहजपणे अवतरते. प्रत्यक्ष जीवन, इतिहास, समाज, राजकारण, कला, धर्म, संस्कृती, प्रत्यक्ष माणूस, निसर्ग इ. प्रमुख विषयांच्या अनुषंगाने भाष्य केले जाते. हे भाष्य अतिशय प्रगल्भतेने केले जाते म्हणूनच भाष्यात्मकता हा प्रवासवर्णनाचा एक महत्त्वाचा विशेष ठरतो.

**७. निरीक्षणशक्तीची कसोटी**

'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकारात लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीची कसोटी लागते. ही निरीक्षण शक्तीची कसोटी लागणे, हा या वाङ्मय प्रकाराचा कुणाही रसिकाच्या लक्षात येईल, असा विशेष आहे. प्रवासवर्णनाचा लेखक तीव्र स्मरणशक्ती असणारा, संवेदनशीलमनाचा आणि सूक्ष्म निरीक्षण शक्ती लाभलेला असावा लागतो. जणू त्याची नजर ससाण्याची किंवा दूर अंतराळात फिरून पृथ्वीवरील भक्ष्य शोधणाऱ्या घारीची असावी. कारण 'प्रवासवर्णन' कार प्रदेश संचार करतो. फिरतो तो थोड्या दिवसांत आणि प्रदेशाच्या मानाने कमी वेळात. तेव्हा त्याने थोड्या वेळात खूपसे पाहिले पाहिजे, अनुभवले पाहिजे. अशा प्रत्यक्ष अनुभवांचे चित्रणच त्याने प्रवासवर्णनात केले पाहिजे, अनुभवले पाहिजे.

**८. प्रगल्भता**

'प्रवासवर्णन' हा एक प्रगल्भ वाङ्मयप्रकार आहे. याचे प्रमुख कारण त्याने लेखकांच्या प्रगल्भ व समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार घडत असतो. हे व्यक्तिमत्त्व बहुढंगी आणि बहुरंगी असते. हे व्यक्तिमत्त्व प्रतिभाशाली लेखकाचे असून प्रवाशाचे असते. तो जे जे पाहील, अनुभवील त्याबद्दलच्या क्रिया-प्रतिक्रिया त्यात व्यक्त होतील. अनोखे असे मनाचे पैलू व चिंतन दिसते म्हणूनच प्रगल्भता हा प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचा एक गुणविशेष ठरतो.

प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकारात वरील अंतर्गत वैशिष्ट्यांमुळे वेगळेपणा येतो. या वेगळेपणामुळेच हा वाङ्मय प्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळ्या पद्धतीने उठून दिसतो. वरील दिलेल्या वैशिष्ट्यांप्रमाणेच लेखकाचे व्यक्तिमत्त्व, प्रवासवर्णनात येणारी तुलना, आत्मपरीक्षण, कल्पना, पारदर्शकता इ. वैशिष्ट्ये आपल्याला सांगता येतात. या सर्व वैशिष्ट्यांचा विचार केला तर 'प्रवासवर्णन' हा इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणे वेगळा व लालित्यपूर्ण वाङ्मय प्रकार आहे हे आपल्याला मान्यच करावे लागते.



'प्रवासवर्णन' हा एक वाङ्मयप्रकार असा आहे की, ज्यात लेखकाच्या सर्वंकष व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर व्यक्त व्हायला खूपच वाव मिळतो आणि लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची व्याप्ती कळायला खूप मदत होते. इतके लौकिक जीवनाशी संबधित असे खाजगी जीवन, त्याच्या आवडी-निवडी, सवयी, रसिकता, बहुश्रुतता, इ. विविध पैलू प्रवासवर्णनात व्यक्त होतात. त्यामुळे त्या लेखनाची रंगत व लालित्य वाढते. एकूणच वरील सर्व विवेचनावरून आपणाला असे म्हणता येते की, प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार त्याच्या अंतर्गत गुणवैशिष्ट्यामुळे इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळा ठरतो. प्रवासवर्णनात त्याचा म्हणून एक खास विशेष असतो. आणि हा खास विशेषच त्याला इतर कथा, कविता, कादंबरी, ललितगद्य या वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळा ठेवतो हेच या प्रवासवर्णनाचे वेगळेपण म्हणता येईल.

●●

**आधारभूत संदर्भग्रंथ**

१. 'महाराष्ट्र शब्दकोश', य.रा.दाते व इतर विभाग ५ वा.
२. 'वाटचाल', वा.ल.कुलकर्णी,'प्रस्तावना'
३. प्रवासवर्णन : एक वाङ्.मय प्रकार, वसंत सावंत.
४. 'मुक्तगद्य संकल्पना आणि उपयोजन, वि.श.चौगुले.
५. 'प्रवासवृत्तमाला', गोविंद चिमणाजी भाटे.
६. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', अनंत काणेकर.